# कळवण पंचायत समिती, कळवण, जिल्हा नाशिक या संस्थेचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस कळवण/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा,नाशिक
लेखा कोष भवन,तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक.
दिनांक-

**प्रेषक,**

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रति,**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

कळवण पंचायत समिती, कळवण, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. सु. ध. ठाकरे, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २९.९.२००८ ते २१.१०.२००८ या कालावधीत पुर्ण केले. श्री. उ. प्र. जोशी, लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ४.११.२००८ सदर लेखापरीक्षण अहवालाचे पुनर्विलोकन केले. श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी या अहवालावर चर्चा करुन अहवालाचे अंतिमीकरण दिनांक २५.११.२००८ रोजी केले.

लेखापरीक्षीत आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी कामकाज पहात होते.

**सभापती**

| | |
|---|---|
| मा. श्री. यशवंत लक्ष्मण गवळी | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. टी. वाय. जाधव | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण )

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार चालु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकुण परि. |
|---|---|---|---|
| १ | १९८१-८२ | १० | १ |
| २ | २०००-०१ | ७,१२,१३<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील समाविष्ठ परिच्छेद क्र.७: हातपंप / विद्युतपंप वर्गणीच्या वसुलीबाबत. (४.१८४)(७)<br>परिच्छेद क्र.१२: थकीत अग्रीम रक्कमेबाबत (४.१८५)(१३)<br>परिच्छेद क्र.१३: अपूर्ण बांधकामाबाबत(४.१८२) (१९) | ३ |
| ३ | २००१-०२ | ५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परिच्छेद क्र.५: हातपंप विदयुतपंप वर्गणीच्या वसुलीबाबत (४.२४९(८) | १ |
| ४ | २००२-०३ | ५,१०<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि.क्र.५ : हातपंप/विद्युतपंप वर्गणी थकबाकी बाबत (४.२०३(६)<br>परि.क्र १० : अपूर्ण बांधकामांबाबत. (४.२०१(१४) | २ |
| ५ | २००४-०५ | १३,१७<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि.क्र.१३ : अग्रिम रक्कमा वसुलीबाबत. (३.३३५)(८)<br>परि.क्र.१७ : अपूर्ण जवाहर विहीरीबाबत. | २ |
| ६ | २००५-०६ | ४,५,६,११,१३,१४,१५,१९,२०,२१<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ परि.क्र.५ : ५०% अनुदानावर शेतक-यांना प्लॅस्टीक घमेले वाटप करण्याचे योजनेबाबत. (४.२३२)<br>परि.क्र.११ : अग्रिम रक्कम वसूलीबाबत (४.७३१)(७)<br>परि.क्र.२१ : अपूर्ण जवाहर विहिरींबाबत (४.७२८)(२५) | १० |

| ७ | लेखापरीक्षण अहवाल सन २००६ – २००७ | २९ |
|---|---|---|
| परिच्छेद क्रमांक ३:- अंदाजपत्रकाबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ४:- पंचायत समिती वाढीव उपकरातून अंगणवाडयांना फायबर खुर्च्या पुरविणेची योजना. | | |
| परिच्छेद क्रमांक ५:- गौण खनिजावरील स्वामित्व धनाची रक्कम वसुल न करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ६:- गौण खनिज रक्कम रुपये १०८९८/- कपात न करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ७:- पंचायत समिती आवारातील दुरुस्तीबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ८:- आयकर, सुरक्षा अनामत व विमा कपात न करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ९:- पंचायत समिती वाढीव उपकरातून प्लॅस्टीक घमेले खरेदीबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १०:- निवासस्थान नोंदवहीबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक ११:- शासनाचे आदेशानुसार देयकात अनुज्ञेय कपाती न करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १२:- विमा हप्त्याची रक्कम देयकातून कपात न करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १३:- मौजे विसापूर शाळेत पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणे. (पंरास प्रस्तावित) | | |
| परिच्छेद क्रमांक १४:- १२ व्या वित्त आयोगातून पिण्याचे पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणे. | | |
| परिच्छेद क्रमांक १५:- विमा हप्ता कपात न करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १६:- थकीत अग्रीम रक्कमांबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १७:- बचत गटाचे देयकासोबत चलने व लाभार्थी हजेरी पट न जोडणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक १८ :- जवाहर रोजगार योजना विहीर अनियमितता. (पंरास प्रस्तावित) | | |
| परिच्छेद क्रमांक १९:- रोजगार हमी योजना अंतर्गत अपूर्ण कामाबाबत. (पंरास प्रस्तावित) | | |
| परिच्छेद क्रमांक २०:- अनामत रक्कमांबाबत. (पंरास प्रस्तावित) | | |
| परिच्छेद क्रमांक २१:- अनामत सदरी तीन वर्षापेक्षा जास्त काळ जमा असलेल्या रक्कमा व्यपगत करणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक २२:- तालुका मास्तर कळवण यांचेकडील रोकडवहीतील धनादेश वाटपाबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक २३:- ग्रामपंचायतींच्या प्रलंबित खास प्रतिवृत्तांतील अपहारातील रक्कमांच्या वसुलीबाबत. (पंरास प्रस्तावित) | | |
| परिच्छेद क्रमांक २४:- पंचायत समिती स्तरावरील विस्तार अधिकारी यांच्या दैनंदिन्या उपलब्ध नसणेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक २५:- उप विभाग (लपा), कळवण यांचेकडील नमुना नं. ३९ व ४१ बाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक २६:- बांधकाम विभागाकडील नमुना नं.३९,४० व ४१ च्या मालमत्ता नोंदवहया अपूर्ण असलेबाबत. | | |
| परिच्छेद क्रमांक २७:- मैल कामगार आस्थापनेवरील खर्चाबाबत. (पंरास प्रस्तावित) | | |
| परिच्छेद क्रमांक २८:- प्रतिभूती बांधपत्रे घेतलेली नाहीत. | | |
| परिच्छेद क्रमांक २९:- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले नाहीत. | | |
| परिच्छेद क्रमांक ३० :- वार्षिक लेखे. | | |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक ३१:- आक्षेप विवरणपत्र. |
| परिच्छेद क्रमांक ३२:- अनुपालन व पोहोच. |

**टिप :-** उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायामध्ये नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतिम समजणेत यावेत.

---

## भाग दुसरा
## (चालु लेखा परीक्षण )

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील अनियमितता.

(वैधानिक तरतुदी विरुध्द केलेली प्रदाने अथवा कार्यवाही)

---

**परिच्छेद क्रमांक ३:- अंदाजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती, कळवणचे सन २००७ – २००८ चे सुधारीत अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक ४६ दिनांक १६.१.२००८ ने मंजूर केले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र | शिर्षक | तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | ४ बांधकाम इ व द | २,५५,००० | २,३६,६९९ | १८,३०१ |
| २ | ११ शेती | २०,००० | १९,९५५ | ४५ |
| ३ | १४ समाजकल्याण | ८०,००० | ७८,३६८ | १,६३२ |
| ४ | २० संकीर्ण महिला व बालकल्याण | ४०,००० | ४०,००० | ० |
| ५ | ३ शिक्षण | ५,००० | ० | ५,००० |
| | | ४,००,००० | ३,७५,०२२ | २४,९७८ |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सुधारीत अंदाजपत्रकामध्ये ३ शिक्षण या लेखशिर्षासाठी रुपये ५,०००/- तरतूद करण्यांत आली आहे. तथापि या शिर्षकाखाली काहीही खर्च करण्यांत आलेला नाही. याबाबत पंचायत समिती सभेचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

२) कमी केलेल्या खर्चाबाबत स्पष्टीकरण सादर करुन पंचायत समितीची मंजूरी घेऊन दाखवावी.

३) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक परांस/१०९३/प्र.क्र.१४४३/२७ दि. २०.९.१९९३ नुसार उपलब्ध निधीचा पुरेपुर विनियोग ग्रामीण जनतेला होईल याबाबत अंदाजपत्रक तयार करतांना काळजी घ्यावी, अशा सुचना दिल्या आहेत. शक्य योजनांसाठी तरतुद केली असती अथवा संबंधित अधिका-यांनी नियोजनपूर्वक कामे केली असती तर बचत झाली

नसती, नियोजन व काटेकोर अंमलबजावणी करणे ही बाब संबंधित अधिका-यांच्या अकार्यक्षमतेकडे निर्देश करते. याबाबत उचित कार्यवाही करुन सर्वकष अहवाल पंचायत समिती सभागृहासमोर ठेऊन त्यावरील क्षमापन दिल्याबाबतच्या ठरावासह अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ४:- पंचायत समिती सेस अंतर्गत फायबर खुर्च्या खरेदी करणेबाबत.**

पंचायत समिती कळवणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता पंचायत समिती सेस अंतर्गत महिला व बालविकास विभागातील अंगणवाड्यांसाठी प्लॅस्टीक खुर्च्या खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च करण्यांत आलेला आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ३१.३.२००८ | ४०,००० | मोहिनी डिस्ट्रीब्यूटर्स, नाशिक रोड यांचेकडून प्रति नग रुपये २५०/- प्रमाणे १६० नग खरेदी केले. |
| | | एकूण | ४०,००० | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक ४८ दिनांक १६.१.२००८ नुसार सदरच्या योजनेची निवड करण्यांत आलेली आहे, मात्र त्यामध्ये अंगणवाड्यांची यादी नमुद नाही. तसेच अंगणवाड्यांचे मागणी प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे लाभार्थी निवड कशाच्या आधारे केली याबाबत पडताळणी करता आलेली नाही. तरी याबाबत पंचायत समितीची कार्योत्तर मंजूरी घेऊन स्पष्टीकरणासह अनुपालन दर्शवावे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. झेडपीए-२००० /प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यांत आलेली नाही.

३) लाभार्थी अंगणवाड्यांचा साठा नोंदवहीत आवक मालाच्या नोंदी घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात पडताळणीस उपलब्ध झालेले नाही.

४) मागणीप्रमाणे माल प्राप्त झाला किंवा कसे याबाबतचे चाचणी अहवाल लेखापरीक्षणात उपलब्ध झालेले नाहीत.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पूर्तता होईपावेतो रक्कम रुपये ४०,०००/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहेत.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधीन रक्कम रुपये ४०,०००/-

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- पंचायत समिती सेस अंतर्गत ५०% अनुदानावर शेतक-यांसाठी प्लास्टीक घमेले पुरविणेबाबत.**

पंचायत समिती कळवणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता पंचायत समिती सेस अंतर्गत शेतक-यांसाठी प्लास्टीक घमेले पुरविण्यासाठी खालीलप्रमाणे खर्च करण्यांत आलेला आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १ | २६.३.२००८ | १९,९५५ | ज्ञानेश्वर स्टील भांडार, कळवण यांचेकडून प्रति नग रुपये ५३.५० दराने ३७३ नग खरेदी |
| | | **एकूण** | १९,९५५ | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक ४९ दिनांक १६.१.२००८ नुसार सदरच्या योजनेची निवड करण्यांत आलेली आहे, मात्र त्यामध्ये लाभार्थी यादी नमुद नाही. त्यामुळे लाभार्थी निवड कशाच्या आधारे केली याबाबत पडताळणी करता आलेली नाही. तरी याबाबत पंचायत समितीची कार्योत्तर मंजूरी घेऊन स्पष्टीकरणासह अनुपालन दर्शवावे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. झेडपीए-२००० /प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यांत आलेली नाही.

३) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी नसल्याने एकाच लाभार्थ्यांस दुबार लाभ देण्यांत आला किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पूर्तता होईपावेतो रक्कम रुपये १९,९५५/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहेत.

लेखाशिर्ष<br>
पंचायत समिती सेस<br>
आक्षेपाधीन रक्कम रुपये १९,९५५/-

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- वडाळा ते मोहपाडा रस्ता १/०० ते ३/०० किमी दुरुस्ती करणे.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | ठराव क्र. ५० दि. १६.१.२००८ क्र. बांख्रा/कावि/५३५/०८ दिनांक १.२.२००८ |
| तांत्रिक मान्यता | क्रमांक ४२ बी दिनांक १६.३.२००८ |
| अंदाजपत्रकाची रक्कम रुपये | ४९,७२९/- |

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नाव | सह्याद्री मजूर सह.संस्था, मर्या. कळवण |
| कार्यारंभ आदेश क्र. व दि. | क्र.जिनपा/बांखा/इवद-२/अर्थ/कआरे/५१/२००८ दि.८.३.२००८ |
| मोजमाप नोंदवही क्र. व पृ.क्र. | ७९ पृष्ठ क्रमांक ८४ |
| कामाची मुदत | ३१.३.२००८ |
| काम पूर्ण दिनांक | - |
| लेखाशिर्ष | पंचायत समिती सेस |
| कामावर झालेला खर्च | रुपये ४९,७२९/- |
| अंतिम प्र.क्र., दि. व रक्कम रु. | ४ / ३१.३.२००८ / ४९,७२९/- |

सदर खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) मक्तेदाराने भरुन सादर केलेल्या बी – १ निविदा फॉर्मवर मक्तेदाराची स्वाक्षरी नाही. तसेच निविदेतील विवरणपत्र १,२,३,४ व ५ मधील माहिती नमुद नाही. त्यामुळे मक्तेदारांकडे असलेले कुशल व अकुशल कामगार, यंत्र सामुग्री, मागील कामांचा अनुभव इत्यादी बाबतची माहिती लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेली नाही त्यामुळे मक्तेदाराची क्षमता व कामाच्या गुणवत्तेबद्दल पडताळणी करता आलेली नाही.

२) मजूर सहकारी संस्थेस दिलेल्या कामाच्या शिफारस पत्रावर दिनांक नमुद नाही, त्यामुळे काम वाटपाबाबत योग्य पध्दतीचा वापर केला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२००४/प्र.क्र.१०९/रा.म.२/दिनांक २२.३.२००५ नुसार अंमलबजावणी करीत असतांना बांधकामाचा दर्जा व गुणवत्ता अपेक्षेप्रमाणे आहे किंवा नाही याची वेळोवेळी खात्री बांधकामाच्या टप्प्यांवर करणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विनिर्दिष्टयात नमुद केलेल्या आय.एस. कोडमध्ये नमुद केल्याप्रमाणे वाचण्याची वारंवारीता पाळणे आवश्यक आहे. मात्र त्याप्रमाणे कार्यवाही केल्याच्या नोंदी नाहीत.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम १५३ नुसार मक्तेदाराने अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे बंधनकारक असतांना काही बाबींवर बचत दर्शवून काही बाबींवर जादा खर्च केलेला आहे व अशा कामांस तांत्रिक अधिका-यांची पूर्ण परवानगी घेण्यांत आलेली नाही. तसेच वाढ – घट विवरणपत्रात तांत्रिक कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत.

५) मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ मधील परिशिष्ट ५ (ब) व शासन परिपत्रक महसूल व वनविभाग क्रमांक एसटीपी-१०६६/२५०१७४/एम दिनांक १७.२.१९७२ नुसार अनामत रक्कमेच्या ३% रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे

कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तरी कमी वसूल रक्कम रुपये २०/- वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

६) तांत्रिक मान्यता आदेशावर उपअभियंता यांची स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही.

७) काम पूर्णत्वाचा दाखला लेखापरीक्षणात पडताळणीस उपलब्ध झालेला नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये ४९,७२९/- आक्षेपाधिन करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये ४९,७२९/-

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- मोहबारी ते बरडपाडा रस्ता ०/०० ते २/०० किमी दुरुस्ती करणे.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | ठराव क्र. ५० दि. १६.१.२००८ क्र. बांखा/कावि/५३५/०८ दिनांक १.२.२००८ |
| तांत्रिक मान्यता | क्रमांक ४१ बी दिनांक ६.३.२००८ |
| अंदाजपत्रकाची रक्कम रुपये | ४९,७३४/- |
| ठेकेदाराचे नाव | सह्याद्री मजूर सह.संस्था, मर्या. कळवण |
| कार्यारंभ आदेश क्र. व दि. | क्र.जिनपा/बांखा/इवद-२/अर्थ/कआरे/५३/२००८ दि.१२.३.२००८ |
| मोजमाप नोंदवही क्र. व पृ.क्र. | १०४ पृष्ठ क्रमांक ४३ |
| कामाची मुदत | ३१.३.२००८ |
| काम पूर्ण दिनांक | - |
| लेखाशिर्ष | पंचायत समिती सेस |
| कामावर झालेला खर्च | रुपये ४९,२७३/- |
| अंतिम प्र.क्र., दि. व रक्कम रु. | ६ / ३१.३.२००८ / ४९,२७३/- |

सदर खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) मक्तेदाराने भरुन सादर केलेल्या बी – १ निविदा फॉर्मवर मक्तेदाराची स्वाक्षरी नाही. तसेच निविदेतील विवरणपत्र १,२,३,४ व ५ मधील माहिती नमुद नाही. त्यामुळे मक्तेदारांकडे असलेले कुशल व अकुशल कामगार, यंत्र सामुग्री, मागील कामांचा अनुभव इत्यादी बाबतची माहिती लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेली नाही त्यामुळे मक्तेदाराची क्षमता व कामाच्या गुणवत्तेबद्दल पडताळणी करता आलेली नाही.

२) मजूर सहकारी संस्थेस दिलेल्या कामाच्या शिफारस पत्रावर दिनांक नमुद नाही, त्यामुळे काम वाटपाबाबत योग्य पध्दतीचा वापर केला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

३)	महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२००४/प्र.क्र.१०९/रा.म.२/दिनांक २२.३.२००५ नुसार अंमलबजावणी करीत असतांना बांधकामाचा दर्जा व गुणवत्ता अपेक्षेप्रमाणे आहे किंवा नाही याची वेळोवेळी खात्री बांधकामाच्या टप्प्यांवर करणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विनिर्दिष्टयात नमुद केलेल्या आय.एस. कोडमध्ये नमुद केल्याप्रमाणे वाचण्याची वारंवारीता पाळणे आवश्यक आहे. मात्र त्याप्रमाणे कार्यवाही केल्याच्या नोंदी नाहीत.

४)	महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम १५३ नुसार मक्तेदाराने अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे बंधनकारक असतांना काही बाबींवर बचत दर्शवून काही बाबींवर जादा खर्च केलेला आहे व अशा कामांस तांत्रिक अधिका-यांची पूर्ण परवानगी घेण्यांत आलेली नाही. तसेच वाढ – घट विवरणपत्रात तांत्रिक कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत.

५)	मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ मधील परिशिष्ट ५ (ब) व शासन परिपत्रक महसूल व वनविभाग क्रमांक एसटीपी-१०६६/२५०१७४/एम दिनांक १७.२.१९७२ नुसार अनामत रक्कमेच्या ३% रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तरी कमी वसूल केलेली रक्कम रुपये २०/- शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

६)	तांत्रिक मान्यता आदेशावर उपअभियंता यांची स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही.

७)	काम पूर्णत्वाचा दाखला लेखापरीक्षणात पडताळणीस उपलब्ध झालेला नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये ४९,२७३/- आक्षेपाधिन करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये ४९,२७३/-

---

**परिच्छेद क्रमांक ८ :- रामा क्र. १८ ते साबळेपाडा रस्ता किमी ०० ते १/५०० दुरुस्ती करणे.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | ठराव क्र. ५० दि. १६.१.२००८ क्र. बांखा/कावि/५३५/०८ दिनांक १.२.२००८ |
| तांत्रिक मान्यता | - |
| निविदा | बी – १ |
| अंदाजपत्रकाची रक्कम रुपये | ४९,७३४/- |
| ठेकेदाराचे नाव | सह्याद्री मजूर सह.संस्था, मर्या. कळवण |
| कार्यारंभ आदेश क्र. व दि. | क्र.जिनपा/बांखा/इवद-२/अर्थ/कआरे/५२/२००८ दि.८.३.२००८ |

| | |
|---|---|
| मोजमाप नोंदवही क्र. व पृ.क्र. | ७९ पृष्ठ क्रमांक ८४ ते ८६ |
| कामाची मुदत | ३१.३.२००८ |
| काम पूर्ण दिनांक | - |
| लेखाशिर्ष | पंचायत समिती सेस |
| कामावर झालेला खर्च | रुपये ४९,७१९/- |
| अंतिम प्र.क्र., दि. व रक्कम रु. | ५ / ३१.३.२००८ / ४९,७१९/- |

सदर खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) मक्तेदाराने भरुन सादर केलेल्या बी – १ निविदा फॉर्मवर मक्तेदाराची स्वाक्षरी नाही. तसेच निविदेतील विवरणपत्र १,२,३,४ व ५ मधील माहिती नमुद नाही. त्यामुळे मक्तेदारांकडे असलेले कुशल व अकुशल कामगार, यंत्र सामुग्री, मागील कामांचा अनुभव इत्यादी बाबतची माहिती लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेली नाही त्यामुळे मक्तेदाराची क्षमता व कामाच्या गुणवत्तेबद्दल पडताळणी करता आलेली नाही.

२) मजूर सहकारी संस्थेस दिलेल्या कामाच्या शिफारस पत्रावर दिनांक नमुद नाही, त्यामुळे काम वाटपाबाबत योग्य पध्दतीचा वापर केला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२००४/प्र.क्र.१०९/रा.म.२/दिनांक २२.३.२००५ नुसार अंमलबजावणी करीत असतांना बांधकामाचा दर्जा व गुणवत्ता अपेक्षेप्रमाणे आहे किंवा नाही याची वेळोवेळी खात्री बांधकामाच्या टप्प्यांवर करणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विनिर्दिष्टयात नमुद केलेल्या आय.एस. कोडमध्ये नमुद केल्याप्रमाणे वाचण्याची वारंवारीता पाळणे आवश्यक आहे. मात्र त्याप्रमाणे कार्यवाही केल्याच्या नोंदी नाहीत.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम १५३ नुसार मक्तेदाराने अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे बंधनकारक असतांना काही बाबींवर बचत दर्शवून काही बाबींवर जादा खर्च केलेला आहे व अशा कामांस तांत्रिक अधिका-यांची पूर्ण परवानगी घेण्यांत आलेली नाही. तसेच वाढ – घट विवरणपत्रात तांत्रिक कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत.

५) मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ मधील परिशिष्ट ५ (ब) व शासन परिपत्रक महसूल व वनविभाग क्रमांक एसटीपी-१०६६/२५०१७४/एम दिनांक १७.२.१९७२ नुसार अनामत रक्कमेच्या ३% रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तरी कमी वसूल केलेली रक्कम रुपये २०/- वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

६) तांत्रिक मान्यता आदेशावर उपअभियंता यांची स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही.

७) काम पूर्णत्वाचा दाखला लेखापरीक्षणात पडताळणीस उपलब्ध झालेला नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये ४९,७१९/- आक्षेपाधिन करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये ४९,७१९/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- मुदतबाह्य प्रवासखर्च बिलांच्या प्रदानाबाबत.**

पंचायत समिती, कळवणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे मुदतबाह्य प्रवास भत्ते बिलांचे प्रदान केल्याचे आढळून आले आहे.

| अ. क्र. | प्र. क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २२ | २४.३.२००८ | ७१३ | श्री. डी. के. वाघ यांचे प्रवासभत्ते देयक माहे ५/२००२ |
| २ | २३ | २४.३.२००८ | १,०६५ | श्री. डी. के. वाघ यांचे प्रवासभत्ते देयक माहे ३/२००२ |
| ३ | २४ | २४.३.२००८ | १९२ | श्री. डी. के. वाघ यांचे प्रवासभत्ते देयक माहे २/२००२ |
| ४ | २५ | २४.३.२००८ | १,४४० | श्री. डी. के. वाघ यांचे प्रवासभत्ते देयक माहे ४/२००३ ते ६/२००३ |
| | | **एकूण** | **३,४१०** | |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ४४ व ४५ नुसार मुदतबाह्य प्रदान अदा करण्यापूर्वी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तसेच लेखा संहितेमधील नियम ५४ नुसार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी प्रत्येक खाते प्रमुखाने लगतपुर्वीच्या महिन्यांत त्यांच्या कार्यालयांत मिळालेल्या बिलांचा गोषवारा व गेल्या महिन्याच्या शेवटी प्रलंबित असलेल्या बिलांची माहिती विहीत नमुन्यांत मुख्य लेख व वित्त अधिकारी यांचे मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावी, अशी तरतुद आहे.

तथापि पंचायत समितीने वरीलप्रमाणे प्रलंबित बिलांची माहिती सादर केलेली नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी प्राप्त न करताच मुदतबाह्य प्रवास भत्त्याच्या रक्कमा प्रदान केलेल्या आहे.

तरी सदरच्या प्रदानाबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत रक्कम रुपये ३,४१०/- तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष

अंतिम अमान्य रक्कम रुपये ३,४१०/-

---

**परिच्छेद क्रमांक १० :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

अ) सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती कळवण येथील गटविकास अधिकारी यांची वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. आर्थिक वर्षात विभागाचे वाहन एम. एच. १५ ए. ए. ५०६७ कार्यक्षेत्राबाहेर फिरल्याच्या नोंदींचा तपशील खालीलप्रमाणे दिला आहे. वाहन वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र. | दिनांक | कोठून कोठे | कि.मी. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ११.०४.२००७ | कळवण ते नाशिक | १८२ | संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, नाशिक |
| २ | २१.०४.२००७ | कळवण ते नाशिक | १८२ | मा. आयुक्त कार्यालय, नाशिक |
| ३ | १४.०५.२००७ | कळवण ते नाशिक | १७२ | खरीप हंगामाबाबत सभा |
| ४ | १६.०५.२००७ | कळवण ते नाशिक | १७२ | १२ वा वित्त आयोग बैठक कामी |
| ५ | १३.०८.२००७ | कळवण ते नाशिक | १७५ | जिल्हा परिषद सभा |
| ६ | १४.०८.२००७ | कळवण ते नाशिक | १७८ | समन्वय सभा |
| ७ | २२.०८.२००७ | कळवण ते नाशिक | १७६ | लेखन सामुग्री आणणे कामी |
| ८ | १२.०९.२००७ | कळवण ते नाशिक | १५० | स्थायी समिती सभा |
| ९ | ११.१०.२००७ | कळवण ते नाशिक | १६० | समाजकल्याण सभा |
| १० | १८.१०.२००७ | कळवण ते नाशिक | १६० | नियोजन बैठक |
| ११ | २५.१०.२००७ | कळवण ते नाशिक | १७० | समाजकल्याण समिती सभा |
| १२ | ०४.११.२००७ | कळवण ते नाशिक | १७८ | सर्वसाधारण सभा |
| १३ | ०१.०१.२००८ | कळवण ते नाशिक | १६८ | स्टेशनरी कामी |
| १४ | ०४.०१.२००८ | कळवण ते नाशिक | १७० | जिल्हा नियामक मंडळाची सभा |
| १५ | ३१.०१.२००८ | कळवण ते नाशिक | १८२ | सर्वसाधारण सभा |
| | | **एकूण** | **२५७५** | |

ब) तसेच एकात्मिक बालविकास सेवा योजनाकडील वाहन क्रमांक एम.एच. १५ के ७०४९ ची वाहन रोजनिशी तपासली असता वाहनाचा पूर्व परवानगी शिवाय कार्यक्षेत्राबाहेर वापर केलेला आहे.

| दिनांक | कालावधी | किमी | तपशिल |
|---|---|---|---|
| २७.२.२००८ | कळवण ते नाशिक | १४० | आढावा बैठक |

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास अ) एकूण किलोमीटर २५७५ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये २०,६००/- व ब) एकूण किलोमीटर १४० ची रु ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितंकडून रुपये १,१२०/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

अ) वसुलपात्र रक्कम रुपये २०,६००/-
ब) वसुलपात्र रक्कम रुपये १,१२०/-
एकूण वसूलपात्र रक्कम रुपये २१,७२०/-

---

**<u>परिच्छेद क्रमांक ११ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.</u>**

अ) सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती कळवण येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ओतुर व नवी बेज यांची वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. आर्थिक वर्षात विभागांचे वाहन एम. एच. १२ पी.ए. ४२४७ व एम. एच. १५ ए. बी. ५०३३ कार्यक्षेत्राबाहेर फिरल्याच्या नोंदींचा तपशील खालीलप्रमाणे दिला आहे. वाहन वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र. | दिनांक | कोठून कोठे | कि.मी. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| **अ) एम. एच. १२ पी.ए. ४२४७** | | | | |
| १ | ११.१२.२००७ | ओतुर ते नाशिक | २१० | आढावा बैठक |
| **ब) एम. एच. १५ ए. बी. ५०३३** | | | | |
| २ | २८.८.२००७ | नवी बेज ते नाशिक | १७२ | कार्यालयीन कामकाज |
| | | **एकूण** | ३८२ | |

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ३८२ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये ३,०५६/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

अ) वसुलपात्र रक्कम रुपये १,६८०/-
ब) वसुलपात्र रक्कम रुपये १,३७६/-
एकूण वसूलपात्र रक्कम रुपये ३,०५६/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (क) खालील अनियमितता.

(एखादया व्यक्तीस संस्थेच्या वतीने मिळालेली रक्कम लेख्यांमध्ये दाखविणे आवश्यक होते, परंतू तशी दाखविण्यांत आली नाही, अशी प्रकरणे)

**निरंक**

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील अनियमितता.

(अ,ब,क व्यतिरीक्त लेख्यांमध्ये आढळून आलेल्या इतर अनियमितता..)

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- बाह्य रुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत.**

पंचायत समिती कळवण मधील प्राथमिक आरोग्य केंद्राकडील खालील दर्शविलेल्या केंद्राच्या रोकडवह्यांची तपासणी केली असता बाह्य रुग्ण फी खालीलप्रमाणे विलंबाने भरणा केल्याची आढळले.

| बाह्यरुग्ण फी जमा केल्याचा कालावधी | रक्कम रुपये | भरणा केलेला दिनांक |
|---|---|---|
| प्राथमिक आरोग्य केंद्र, जयदर | | |
| १७.८.२००७ ते २१.९.२००७ | १,७३६ | ०१.१०.२००७ |
| १९.१.२००८ ते १३.३.२००८ | १,८४६ | १९.०३.२००८ |
| प्राथमिक आरोग्य केंद्र, कनाशी | | |
| १.७.२००७ ते ३१.७.२००७ | १,९१४ | ०६.०८.२००७ |
| प्राथमिक आरोग्य केंद्र, देसराणे | | |
| १.७.२००७ ते ३१.७.२००७ | २८८ | ०६.०८.२००७ |
| प्राथमिक आरोग्य केंद्र, नवी बेज | | |
| १.७.२००७ ते ३१.७.२००७ | १,२०६ | ०९.०८.२००७ |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १३ अन्वये वसूल केलेली रक्कम दररोज जमा करणे आवश्यक आहे. नियम क्रमांक ४९ अन्वये उशिरात उशिरा १५ दिवसात रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. बाह्यरुग्ण फी जास्त दिवस हातात ठेवणे ही बाब नियमबाह्य असून या अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे क्षमापन घेऊन पूर्तता दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक १३ :- थकित अग्रिम रक्कमेबाबत.

या अहवालासोबत जोडण्यांत आलेल्या विवरणपत्र क्रमांक “३(अ)” नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर कार्यालयीन कर्मचारी / प्राथमिक शिक्षक यांचेकडे उत्सव, धान्य, प्रवास भत्ता, वेतन, पेट्रोल-डिझेल, पाणीपुरवठा इत्यादी प्रकारच्या अग्रीमाची रक्कम रुपये ३९,०६९/- सन १९८५-८६ ते १९८९-९० पर्यंत थकीत असल्याचे दिसून येते.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.लेपअ/१०९२/ प्र.क्र.१४६९ /३० दिनांक २६.२.१९९३ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन रक्कम रुपये ३९,०६९/- वसुल करणेची कार्यवाही करावी आणि तसे अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

देण्यात आलेल्या अग्रिम रक्कमेची वसुली / समायोजन वेळीच होणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमांची वसुली वेळीच न झाल्यास जबाबदार असणारे अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द उचित कारवाई करुन त्यांचेकडून ही रक्कम वसुल करावी.

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत.**

पंचायत समिती, कळवणच्या सन २००७ – २००८ साठीच्या हातपंप / विद्युतपंप देखभाल दुरुस्तीची वर्गणी नोंदवहीची पडताळणी केली असता या सोबतच्या परिशिष्ट क्रमांक "१" मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर हातपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी रक्कम रुपये १४,६३६/- अदयापही ग्रामपंचायतीकडून वसुल करणे बाकी आहे.

याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश क्रमांक भुजल १०९५/ प्र.क्र. २१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप / विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीची प्रलंबित वग्रणी संबंधित ग्रामपंचायतीकडून रोख स्वरुपात अथवा देय अनुदानातुन सत्वर वसुल करावी व पुर्तता दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमंक १५ :- संबंधितांना लिहिलेले धनादेश प्रदान न केलेबाबत.**

पंचायत समिती कळवणकडील अभिकरण योजनेच्या व जिल्हा परिषद सेसच्या सन २००७ – २००८ मधील रोखवही व धनादेश पुस्तक यांची पडताळणी केली असता काही धनादेश अद्यापपर्यंत संबंधितांना प्रदान करणेत आलेले नाहीत, असे आढळून आले.

| धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| **अ) अभिकरण योजना** | | |
| २७४४९८ | ३१.३.२००८ | ११,९७२ |
| ३७४५२३ | ३१.३.२००८ | १८,००० |
| २७४५२४ | ३१.३.२००८ | १०,०९५ |
| **ब) जिल्हा परिषद सेस** | | |
| ९२५६४५ | ३१.३.२००८ | ३,००० |
| ९२५६५० | ३१.३.२००८ | ४५,६०० |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम २७ अन्वये लागलीच आवश्यकता असलेशिवाय खर्च करण्यस अनुमती नाही, असे असतांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी केवळ त्या त्या लेखशिर्षाखालील अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून आवश्यकता नसतांनाच दिर्घदिन खर्च नोंदविलेला आहे. सदरचे धनादेश संबंधितांना वितरीत करुन खुलाशासह अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- मुदतबाह्य धनादेश रद्द न करणेबाबत.**

पंचायत समिती कळवणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे धनादेशांची १ वर्षाची मुदत संपलेली असतांना अद्यापपावेतो रद्द केलेले नाहीत, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे –

| लेखाशिर्ष | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| जिल्हा परिषद सेस | ६३२६ | ३०.३.२००७ | २,००० |
| जिल्हा परिषद सेस | ६३२७ | ३०.३.२००७ | २,००० |
| जिल्हा परिषद सेस | ५२२८ | ३०.३.२००७ | ५,००० |
| जिल्हा परिषद सेस | ५२७३ | ३०.३.२००७ | ११,००० |
| जिल्हा परिषद सेस | ५३०९ | ३०.३.२००७ | १०० |
| जिल्हा परिषद सेस | ५३१८ | ३०.३.२००७ | ३०० |
| जिल्हा परिषद सेस | ५३२० | ३०.३.२००७ | १०० |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ३१ नुसार धनादेश दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत अशा धनादेशाची मुदत वाढवून घेतली नाही तर असा धनादेश रद्द करण्यांत यावा अशी तरतूद आहे. परंतु पंचायत समिती कळवणने वरील धनादेशांची एक वर्षाची मुदत संपलेली असतांनाही सदरचे धनादेश रद्द केलेले नाहीत. तरी सदरचे धनादेश त्वरीत रद्द करुन आवश्यक त्या नोंदी कॅशबुक, काऊंटर फाईल व अनुरुप जमा शिर्षाखाली घेऊन अनुपालन दाखवावे.

**परिच्छेद क्रमांक १७ :- मुदतबाह्य धनादेशाद्वारे केलेल्या प्रदानाबाबत.**

पंचायत समिती कळवणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे मुदतबाह्य धनादेशाद्वारे रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

| अ.क्र. | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम रुपये | धनादेश वटविल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ८९९०९४ | ३०.६.२००७ | ४३,४२४ | २४.४.२००८ |
| २ | ८९९०९५ | ३०.६.२००७ | २२,९०८ | ११.१.२००८ |
| ३ | ८९९०९६ | ३०.६.२००७ | २४,८९९ | ११.१.२००८ |
| ४ | ८९९०९७ | ३०.६.२००७ | ४८,५३२ | १५.१.२००८ |
| ५ | ८९९०९८ | ३०.६.२००७ | २४,५२४ | ०३.४.२००८ |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ३१ नुसार धनादेश दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी प्रचलित राहणार नाही. या मुदतीनंतर अशा धनादेशवर बँकेने अदायगी देण्याचे नाकारावे. अथवा संबंधित मागणीदारास या मुदतीनंतर अशा धनादेशाची मुदत ज्याने धनादेशावर सही केली त्या अधिका-याच्या तारखेसहीत स्वाक्षरीने वाढवून घेता येईल. अशा बाबींची सामान्य चेकबुकमध्ये मुळ नोंदींच्या समोर व रोखवहीत नोंद घेण्यात येईल, अशा तरतुदी असतांना संबंधित कर्मचारी / अधिकारी यांनी यावर कोणतेही नियंत्रण ठेवलेले नाही. कोणत्याही प्रकारच्या नोंदी न करताच प्रदान केलेले आहे. ज्या धनादेशांची मुदत समाप्त होणार असेल अशा धनादेशांची यादी बँकेस देऊन प्रदाने थांबविण्याबाबत सूचना देणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही झालेली नाही.

याबाबत आवश्यक त्या नोंदी घेण्यांत येऊन अनियमिततेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

## परिच्छेद क्रमांक १८ :- नविन परिभाषित अंशदान निवृत्त वेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/१२६/ सेवा – ४ दिनांक ३१.१०.२००५ व क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४ दिनांक ७.७.२००७ अन्वये राज्य शासनाने दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन परिभाषित अशंदान योजना अंमलात आणली आहे. सदरच्या योजनेतंर्गत दिनांक १५ ऑगस्ट २००७ पूर्वी विहीत नमुन्यांतील अर्ज राज्य देखभाल अभिलेख अभिकरणाकडे सादर करुन लेखा क्रमांक प्राप्त करणे आवश्यक आहे.

पंचायत समिती कळवणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता अर्धसमास पत्र क्रमांक १ दिनांक १८.१०.२००८ अन्वये प्राप्त झालेल्या विवरणपत्र क्रमांक “ ५ ” माहितीनुसार पंचायत समिती कळवण अंतर्गत ३६ कर्मचारी दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेले आहेत.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या ३६ कर्मचा-यांचे राज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे नोंदणी करुन निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करण्यांत आलेले नाहीत.

२) या योजनेतंर्गत कर्मचा-यांकडून देय ठरणारे अंशदानाची १०% रक्कम रुपये ४,०३,६५८/- वसूल करुन अनामत लेखाशिर्षाखाली जमा घेण्यात आलेली आहे. वास्तविक सदरची रक्कम वेळोवळी शासन सदरी भरणा करणे आवश्यक असतांना

त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे भविष्यात सदरच्या कर्मचा-यांना शासनाकडून देय ठरणा-या समतुल्य अशंदानाबाबत अडचणी निर्माण होऊ शकतात.

तरी याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन वसूल करण्यांत आलेली रक्कम रुपये ४,०३,६५८/- शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- अफरातफर रक्कमांबाबत.**

अर्धसमास पत्र क्रमांक १० दिनांक १८.१०.२००८ अन्वये पंचायत समितीतील एकूण प्रलंबित अफरातफर प्रकरणे, निकाली लागलेले प्रकरणे, प्रलंबित कोर्ट केसेस, त्यावर झालेला कोर्ट केसेस निहाय खर्च, कोर्टाचे लागलेले निकाल, प्रलंबित केसेस, कोर्ट केसचे संभाव्य दायित्वाची रक्कम इत्यादीबाबत माहिती मागविण्यात आली होती.

पंचायत समिती कळवणने उपरोक्त नमुद अर्धसमासपत्रांस अनुसरुन अर्धसमास पत्रांसोबत जोडलेल्या विवरणपत्रांनुसार अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक २ प्रमाणे माहिती उपलब्ध केलेली आहे.

१) ग्रामनिधी एकूण २१ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ५,६९,३८५/- इतकी अपहारीत झाल्याचे निदर्शनास येते.

२) जवाहर रोजगार योजना व एन.आर.ई.टी. योजनेतंर्गत एकूण ८ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये १२,९८,७७६/- इतकी उपहारीत झाल्याचे निदर्शनास येते.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सदरच्या अपहारीत रक्कम ह्या सन १९८९ – ९० पासून आजपावेतो प्रलंबित असून त्या रक्कमा वसूलीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

२) सदरच्या अपहारीत रक्कमा ह्या ज्या कर्मचा-यामुळे झालेल्या आहेत. त्यातील बरेचसे कर्मचारी हे सेवा निवृत्त तसेच मयत झाले असल्याने त्या रक्कमा वसूलीबाबत काय कार्यवाही केली याबाबत कोणतेही नियोजन केलेले दिसून येत नाही.

३) ज्या अपहारीत रक्कमा झालेल्या आहेत त्या प्रकरणांबाबत कोणतीही प्रशासकीय तसेच फौजदारी गुन्हा दाखल केल्याची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

४) सेवा निवृत्त / मयत कर्मचा-यांचे बाबतीत त्यांचेकडे कोणतीही शासनाची रक्कम थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) नादेय दाखले देण्यांस जबाबदार कोण याची माहिती उपलब्ध करुन संबंधितांकडून रक्कमा वसूलीबाबत कार्यवाही करण्यांत यावी. सेवा निवृत्तीचे वेळीच त्यांना देय असलेल्या रककमेमधून वसूलीची कार्यवाही न करण्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यांत यावे व सदरबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी.

---

## परिच्छेद क्रमांक २० :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण ठेवल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती कळवण यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसूर झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबध्द केलेली नाहीत.

५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भाकिंत लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी.

उपरोकत आक्षेपांबाबत अंतर्गत लेखापरीक्षणाकडून उचित पडताळणी करुन त्यांचा अहवाल व त्यावरील कार्यवाही अहवालासह निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व सर्व आदेश नोंदवहीसह अद्ययावत करुन दुबार प्रदान / जादा प्रदानाबाबत पडताळणी करुन पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

वरीलप्रमाणे नोंदवह्या व अभिलेखे अपूर्ण ठेवल्यामुळे बरेचसे अतिप्रदान झालेले आहे. अतिप्रदानाबाबतचे आक्षेप स्वतंत्रपणे अहवालासोबत जोडण्यांत आलेले आहेत.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- पूर्ण केलेल्या कामांची नोंदवही न ठेवणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेख संहिता १९६८ मधील नियम १९७ नुसार पंचायत समितीच्या बांधकाम शाखेने नमुना नंबर ६९ मध्ये पूर्ण केलेल्या कामांची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रत्येक कामाचे नाव, कामाचे ठिकाण, काम सुरु झाल्याची तारीख, काम पूर्ण झाल्याची तारीख, कामाचा एकूण खर्च, वार्षिक देखभालीचा अंदाजित खर्च व स्थावर मालमत्ता नोंदवहीतील संदर्भिय नोंदी तरतुद आहे. मात्र पंचायत समितीने अशा प्रकारची नोंदवही अभिरक्षीत केलेली नाही. त्यामुळे आतापर्यंत पंचायत समितीने किती कामे पूर्ण केलेली आहेत कोणत्या कामावर दुबार खर्च करण्यांत आला याबाबत लेखापरीक्षणांत पडताळणी करता आलेली नाही.

तरी नमुना नंबर ६९ मध्ये सदरची नोंदवही तयार करुन त्यामध्ये अद्ययावत नोंदी घेऊन लेखापरीक्षणांस दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- जवाहर विहिरी बांधकामातील अनियमितता**

पंचायत समिती कळवणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक " ३ " मध्ये नमुद केल्याप्रमाणे जवाहर विहिरी बांधकामात खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

१) सन २००३ – २००४ सन २००४ – २००५ मध्ये मंजूर केलेल्या विहिरींपैकी २७ विहिरींचे काम सन २००७ – २००८ मध्ये पूर्ण केलेले असून ८ विहिरींचे काम अद्यापही अपूर्ण स्थितीत आहे. पूर्ण केलेल्या विहिरींवर एकूण रुपये १६,२०,०००/- खर्च करण्यांत आलेला आहे. सदरच्या विहिरी १२ महिन्यांच्या आत पूर्ण करणे आश्यक होते मात्र ४ वर्षे उशिराने पूर्ण केल्यामुळे शेतक-यांना ४ वर्षे लाभांपासून वंचित राहावे लागलेले आहे व शासनाचा उद्देश सफल झालेला नाही.

२) सदरच्या सर्व विहिरींसाठी एकाच प्रकारचे अंदाजपत्रक वापरण्यांत आलेले आहे. म्हणजेच ट्रायलपीट न घेता व प्रत्यक्ष भू - स्वरुपांचा अभ्यास न करताच एक समान अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येते.

३) अंदाजपत्रकाप्रमाणे बांधकाम होणे अपेक्षित आहे व त्यानंतरच संबंधित अभियंत्याने / अधिका-याने काम पूर्णत्वाचा दाखला देणे आवश्यक आहे. तथापि सदरच्या विहिरींचे अत्यावश्यक भितींचे बांधकाम पूर्ण केलेले नसतांना, म्हणजे केवळ खोदाई पूर्ण झालेली असतांना पूर्णत्वाचा दाखला दिल्याचे मोजमाप पुस्तिकेवरुन दिसून येते. बांधकाम तांत्रिक दृष्टया पूर्ण केलेले नसतांना केवळ ३१ मार्च अखेर अनुदान खर्च करण्यासाठी पूर्णत्वाचा दाखला दिलेला आहे. ही कार्यवाही नियमबाह्य आहे.

४) मोजमाप पुस्तिकेत नोंदीच्या दिनांक नमुद नाहीत, तसेच उपअभियंता / गटविकास अधिकारी यांनी अशा कामांना भेट दिल्याबाबतच्या नोंदी ५% तपासणी केल्याबाबतच्या स्वाक्षरी मोजमाप पुस्तकात घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे विकास कामांवर योग्य नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होते.

याबाबत विहिरींची बांधकामे पूर्ण करुन मोजमाप पुस्तिकेत नोंदवून कार्यकारी अभियंता, (रोजगार हमी योजना), विभागीय आयुक्तालय, नाशिक अथवा समकक्ष तांत्रिक अधिकारी यांचे क्षमापनासह अनुपालन सादर करावे

वरील पुर्तता होईपर्यंत खर्चाची रक्कम रुपये १६,२०,०००/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- जवाहर विहिरींच्या अपूर्ण बांधकामाबाबत.**

पंचायत समिती कळवणचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता सोबतच्या परिशिष्ट क्रमांक “ ४ ” मध्ये नमुद केल्याप्रमाणे जवाहर विहिरींची ८ कामे अद्यापपावेतो अपूर्ण स्थितीत आहेत व त्यातील २ विहिरींची कामे अद्याप सुरु करण्यांत आलेली नाहीत. सदरची कामे सन २००३ – २००४ पासून अपूर्ण स्थितीत असून त्यावर आजपावेतो रक्कम रुपये २,२८,४२३/- एवढा खर्च करण्यांत आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. जाविका-१२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरींचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून २ महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना त्याप्रमाणे शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. तरी याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

२) कळवण उपविभागात एकूण ८ विहिरींची कामे अपूर्ण आहे. त्यामुळे अपूर्ण कामावर झालेला खर्च, सदरील कामे वेळीच पूर्ण झालेली नसल्यामुळे व्यर्थ जाण्याची शक्यता आहे. याबाबत अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचे पत्र क्रमांक ६५ दिनाक १३.९.२००१ अन्वये प्रत्येक लाभार्थ्यांकडून १८% दराने व्याज आकारणी करुन दंडनीय कारवाई करण्यांत यावी.

३) ज्या विहिरींची कामे अद्यापपावेतो सुरु करण्यांत आलेली नाहीत त्या विहीरींचे प्रस्ताव रद्द करण्याबाबतची कार्यवाही करुन भविष्यात अशा लाभार्थ्यांना अशाप्रकारचे लाभ मंजूर करण्यांत येऊ नयेत याबाबत उचित निर्णय घेऊन कार्यवाही दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- बांधकाम उपविभाग, कळवण यांचेकडील मालमत्ता नोंदवही क्रमांक ३९,४० व ४१ अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ९७ अन्वये बांधकाम विभागाने नमुना क्रमांक ३९, ४० व ४१ मध्ये स्थावर मालमत्तांच्या नोंदी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम ९८ अन्वये सर्व स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी माहे जून मध्ये वरीष्ठ कार्यालयाला सादर करणे, या प्रमाणपत्रात प्रत्यक्ष साठ्यात उपलब्ध नसलेल्या वस्तूंसंबंधी स्पष्टीकरण देणे, तसेच कोणतेही साहित्य समुचित मंजूरीशिवाय निर्लेखित करण्यांत आलेले नसल्याचे नमुद करणे आवश्यक आहे.

पंचायत समिती, कळवण यांच्याकडील मालमत्ता नोंदवह्या तपासल्या असता त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) नोंदवही नमुना नंबर ३९ :- मालमत्ता नोंदवहीत बांधलेल्या इमारतींच्या नोंदी घेतल्या असून त्यातील रकाने क्रमांक ७ ते १३ अपूर्ण आहेत. इमारतींच्या नुतनीकरणासाठी केलेल्या खर्चाच्या नोंदी करण्यांत आलेल्या नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत सदरच्या इमारतींचे मुल्य किती? तसेच आजपावेतो किती वेळेस व किती खर्च दुरुस्तीवर करण्यांत आलेला आहे, नोंदीअभावी लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.
२) नोंदवही नमुना नंबर ४० :- सदरच्या नोंदवहीतील रस्त्याच्य नोंदी परिपूर्ण नाहीत तसेच नुतनीकरणावरील खर्च नोंदवहीत नमुद केलेला नसल्यामुळे दुबार खर्च झालेला आहे किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.
३) नोंदवही नमुना क्रमांक ४१ :- सदरच्या नोंदवहीतील रिकाम्या जागेच्या नोंदी घेतल्या असून काही रकाने अपूर्ण आहेत. सदरच्या रिकाम्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याबाबतचे उपअभियंता यांनी प्रमाणित केलेले नाही. याबाबत ७/१२ उतारे प्राप्त करुन उपअभियंता यांचे प्रमाणपत्रासह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

वरीलप्रमाणे नमुना क्रमांक ३९, ४० व ४१ नोंदवह्यांतील परीपूर्ण नोंदी घेण्यांत याव्यात व आवश्यक प्रमाणपत्रे व उतारे घेऊन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

## परिच्छेद क्रमांक २५ :- लघुपाटबंधारे उपविभाग, कळवण यांचेकडील नोंदवही क्रमांक ३९ व ४१ अपूर्ण असणेबाबत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखा संहिता १९६८ मधील नियम क्रमांक ९७ अन्वये लघुपाटबधांरे विभागाने स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना क्रमांक ३९ व ४१ मध्ये अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम ९८ अन्वये सर्व स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी माहे जून मध्ये वरीष्ठ कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

पंचायत समिती, कळवण यांचेकडील लघुपाटबंधारे उपविभागातील नोंदवह्या तपासल्या असता खालीलप्रमाणे अपूर्णता आढळून आलेल्या आहेत.

१) सदरच्या नोंदवहीतील गावतळे, पाझरतलाव यांचे संदर्भात संबंधित संपादित जमिनींचे ७/१२ उतारे प्राप्त करुन नोंदी घेण्यांत आलेल्या नाहीत.

२) सदरच्या जागेवर अतिक्रमणे झालेली नसल्याचे उपअभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, कळवण यांनी प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

३) सदरच्या कामावर नुतनीकरणासाठी किती वेळेस किती खर्च केलेला आहे. याबाबतच्या नोंदी नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत.

मागिल लेखापरीक्षण अहवालात आक्षेप नोंदवूनही सदरच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवलेल्या आहेत. तरी नोंदवहीतील सर्व रकाने भरुन परिपूर्ण नोंदी व ७/१२ उता-यांसह विलंबाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- लेख्यांची स्थिती**

पंचायत समितीची लेखा स्थिती सर्वसाधारण बरी असल्याचे आढळुन आले. तथापि त्यामध्ये सुधारणा करण्यास वाव आहे. थकीत आक्षेपांचा निपटारा करणे आवश्यक आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- आक्षेप विवरणपत्र**

किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता लेखापरीक्षण कालावधीत करुन घेण्यात आल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित करणेत आलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- वार्षिक लेखे.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे संपूर्ण पूर्ततेस अधिन राहून व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील जमा खर्चामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेली नाही याआधारे पंचायत समितीचे सन २००६-२००७ चे लेखे बरोबर आढळून आले आहेत, असे नमुद करण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- आक्षेप विवरणपत्र.**

किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता लेखापरीक्षण कालावधीत करुन घेणेत आल्याने आक्षेप विवरणपत्र निर्गमीत करण्यात आलेले आहे.

---

**परिच्छेद क्रमांक ३० :- अनुपालन व पोहोच.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे अनुपालन, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे हा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाले पासुन चार महिनेच्या आत, पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद- नाशिक यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविणेत यावे. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देणेत यावी.

(वि.ए.कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत सविनय सादर**

१) मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई. (पत्राने)
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई.
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
५) मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक.

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई
२) म. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कळवण, जिल्हा- नाशिक.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक